**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)**
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका
जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/५५४८
दि. १०/११ / २०२०.

## आज्ञापत्र

**विषय :-** पुणे महानगरपालिका आगामी सार्वत्रिक निवडणूक सन २०२२ च्या पूर्वतयारी करिता अधिकारी/ कर्मचारी यांची हंगामी नेमणूकीबाबत.

आगामी पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२२ च्या पूर्व तयारीच्या दृष्टीने निवडणूक कार्यालयाकडे जादा कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून पारित केलेले आदेशाची वेळेत पूर्तता करणे व निवडणूक विषयक महत्वाचे आदेश संबधित सर्व विभागांना पाठविणे त्याची तयारी करणे, निवडणूक विभागाकडील रेकॉर्ड व माहिती अद्ययावत करणे.

याकरिता खालील नमूद केलेल्या सेवकांनी यापूर्वी निवडणूक कार्यालयाकडे काम केले असल्याने त्यांना निवडणूक कामकाजाची माहिती आहे.

सबब पुणे महानगरपालिकेतील खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनास त्यांचे मूळ खात्यात परंतु प्रत्यक्ष कामास निवडणूक कार्यालयाकडे पुढील आदेश होईपर्यंत उप आयुक्त (निवडणूक) यांचे नियंत्रणा अंतर्गत निवडणूक विभागाकडे या आज्ञापत्राच्या दिनांकापासून नेमणुका करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | सेवकाचे नांव | हुद्दा | कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | श्री. योगेश विलास जोशी | उप अधिक्षक | आरोग्य विभाग |
| २ | श्री. सुरेश प्रतापराव माखजनकर | उप अधिक्षक | समाज विकास विभाग |
| ३ | श्री. दिपक पांडुरंग मोहंडूळे | लिपिक टंकलेखक | कर आकारणी व कर संकलन विभाग |

प्रस्तुत आदेश हाच कार्यमुक्ती आदेश समजून दिनांक १०/११/२०२० पासून उपरोक्त कर्मचाऱ्यांनी विनाविलंब निवडणूक विभाग येथे तातडीने रुजू व्हावे. सदर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करणेबाबत कोणतीही शिफारस विचारात घेतली जाणार नाही.

सदर कर्मचारी पूर्ण वेळ या निवडणूक कार्यालयाकडे काम करणार असल्यामुळे त्यांची दरमहा हजेरी न चुकता त्यांचे मूळ खात्याकडे पाठविण्याची व्यवस्था निवडणूक कार्यालयाने करावयाची आहे.

सदर कर्मचारी जरी निवडणूक कार्यालयाकडे काम करीत असले तरी त्यांचे वेतन व भत्ते संबधित मूळ खात्यानेच अदा करावयाचे आहे.

Rubal
9/11/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

C:\Users\Election-PC\Desktop\DILIP\LETTER\Genral Lette R.Docx405